दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४१८ वा • मंगळवार, ता.३० सप्टेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००



## महापारेषण जनसंपर्क विभागाला राष्ट्रीय पातळीवरील तीन मानाचे पुरस्कार

**मुंबई | रयत समाचार**

पब्लिक रिलेशन्स काऊन्सिल ऑफ इंडिया (PRCI) तर्फे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील पारितोषिक वितरण सोहळ्यात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाने राज्याचा लौकिक वाढवला आहे. गोवा विधानसभेचे सभापती डॉ. गणेश गावकर यांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा पार पडला. महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट नियतकालिक, डिजिटल मीडिया इनोव्हेशन्स आणि कार्पोरेट कम्युनिकेशन एक्सलन्स या तीन मानाच्या विभागांत पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी स्वीकारला. या यशाबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी जनसंपर्क विभागाचे मनः पूर्वक अभिनंदन करत, ''या सन्मानामुळे कंपनीची जनसंपर्कातील कामगिरी राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे,'' अशी भावना व्यक्त केली.. महापारेषणच्या कामगिरीने राज्याच्या जनसंपर्क क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित केले असून, या यशामुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ७७ आंदोलनकर्त्यांचे खटले मागे घेण्याची शिफारस

### माजी आमदार, खासदार संबंधित प्रकरणांचा अंतिम निर्णय मुंबई उच्च न्यायालयात

**मुंबई | रयत समाचार**

राज्यातील विविध धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान पोलिसांकडे दाखल झालेल्या २०१ अर्जदारांपैकी ७७ अर्जदारांवरील खटले मागे घेण्याची शिफारस मंत्रिमंडळ उपसमितीने केली असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.



स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले तसेच वैयक्तिक व दिवाणी प्रकरणे शासन धोरणांतर्गत माफ होऊ शकत नसल्याने अशा खटल्यांना स्पष्ट नकार देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार, माजी आमदार, खासदार व माजी खासदार यांच्याशी संबंधित सहा प्रकरणांचा अंतिम निर्णय मात्र मुंबई उच्च न्यायालयातच घ्यावा लागणार असल्याचे त्यांनी नमूद केले. शासन निर्णय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार त्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. या संदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक सह्याद्री अतिथीगृहात झाली. बैठकीस विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव उदय शुक्ला, अभियोग संचालनालयाचे संचालक अशोक भिल्लारे, गृह विभागाचे उपसचिव चेतन निकम यांच्यासह राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांच्या प्रलंबित खटल्यांबाबत सकारात्मक पाऊल उचलल्याने अनेकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## 'बलराम' शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ- खा. तानवडे

**काणकोण | रयत समाचार**

''बलराम शिक्षण संस्था ही एक आदर्शवत संस्था असून अवघ्या एकोणीस वर्षांत संस्थेने घेतलेली भरारी स्तुत्य आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत येथील शिक्षक व कर्मचारी खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या निष्ठा व मेहनतीमुळेच ही संस्था आज शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ ठरली आहे,'' असे गौरवोद्गार राज्यसभेचे खासदार सदानंद शेट तानावडे यांनी काढले.




### १९ वा स्थापनादिन उत्साहात

आदर्शग्राम आमोणे पैंगीण येथे बलराम निवासी विद्यालयाच्या सभागृहात संस्थेचा १९ वा स्थापनादिन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी तानावडे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व गोव्याचे कला व संस्कृती मंत्री डॉ. रमेश तवडकर, दक्षिण गोव्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश गावकर, संस्थेचे अध्यक्ष अंकुश गावकर, मुख्याध्यापिका सविता तवडकर, श्रीस्थळ पंचायतीच्या सरपंचा सेजल गावकर, सचिव जानू तवडकर, खजिनदार गणेश गावकर, राजेंद्र वेळीप, खोतिगाव सरपंचा वृंदा वेळीप, मुख्याध्यापक अशोक गावकर, कविता नाईक गावकर, चंद्रकांत वेळीप तसेच संस्थेचे इतर सभासद उपस्थित होते. तानावडे पुढे म्हणाले की, ''भविष्यात या संस्थेतून अनेक डॉक्टर आणि अभियंते घडतील. तसेच गोव्यातील अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास बलराम शिक्षण संस्था नेहमीच पुढाकार घेईल.'' यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रमेश तवडकर म्हणाले, ''दुर्गम आदिवासी भागातील मुलांना शैक्षणिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली. आज हा वटवृक्ष शिक्षक आणि कार्यकर्त्यांच्या कष्टांमुळे फुलला असून संस्था प्रगत शिक्षणाकडे वाटचाल करत आहे.'' या कार्यक्रमात गतवर्षी दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी संसद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत खासदार निधीतून बलराम उच्च माध्यमिक विद्यालयाला बस सुपूर्द करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गावकर यांनी केले. स्वागत गणेश गावकर यांनी केले, तर आभार कविता नाईक गावकर यांनी मानले.

## खाऊचे पैसे पूरग्रस्तांसाठी राजनंदिनी, राजवीर मालेगावकर यांचा आदर्श

**बारामती | रयत समाचार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बारामतीत समाजबांधवांनी अवघ्या तीन दिवसांत तब्बल २७ लाख ५२ हजार ३०० रुपये मुख्यमंत्री सहायता निधीसाठी जमा केले. याबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी सर्वांचे आभार मानले. याच पार्श्वभूमीवर करंजेपुल येथील राजनंदिनी आणि राजवीर मालेगावकर या लहानग्यांनी आपले खाऊचे साठवलेले २ हजार ३०० रुपये पूरग्रस्तांना मदत म्हणून सुपुर्द केले. ''आम्हाला नाही तर आमच्या शेतकरी बांधवांना खाऊची गरज आहे,'' अशी मनापासूनची भावना व्यक्त करत त्यांनी दाखवलेले मोठेपण सर्वांचे मन जिंकून



गेले. या निरागस मदतीबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन्ही भावंडांचे विशेष अभिनंदन करत कौतुक व्यक्त केले. ''लहान वयात सामाजिक जाण असणाऱ्या मुलांमुळे समाजात आशेचा किरण दिसतो,'' असेही ते म्हणाले. राजनंदिनी व राजवीर यांच्या या उपक्रमाने बारामतीतच नव्हे तर संपूर्ण राज्यात सामाजिक संवेदनशीलतेचा सुंदर आदर्श निर्माण केला आहे.



## अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीपत्रे प्रदान - निवासी आयुक्त आर. विमला

### दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना दिलासा

**नवी दिल्ली | रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाच्या अनुकंपा तत्त्वावरील भरती धोरणातील सुधारणा आता प्रत्यक्षात दिसू लागल्या आहेत. प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेली अनेक प्रकरणे मार्गी लागून अनेक कुटुंबांची प्रतीक्षा संपत चालली आहे. याचाच प्रत्यय आज नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात आला.

तब्बल १३ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर दोन दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती आर. विमला यांच्या हस्ते दिवंगत कर्मचारी प्रदीप कुमार (सफाईगार) यांचे पुत्र आकाश कुमार यांना कक्षबंध परिचारक पदावर, तर दिवंगत पुरणचंद (कक्षबंध परिचारक) यांचे पुत्र गोपाल यांनाही त्याच पदावर नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या नियुक्तींमुळे आकाशची १० वर्षांची आणि गोपालची तब्बल १२ वर्षांची प्रतीक्षा संपली. नियुक्तीपत्र स्वीकारताना दोन्ही कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिलासा आणि समाधान झळकत होते. पितृछत्र हरवलेल्या या तरुणांना कुटुंबाला आर्थिक स्थैर्य व सन्मानाचे जीवन देण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. यावेळी श्रीमती विमला म्हणाल्या, आधार गमावलेल्या कुटुंबांना त्वरित नोकरी देऊन उभारी देणे ही केवळ अधिकाऱ्यांची जबाबदारी नसून संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. महाराष्ट्र शासनाचे हे धोरण खऱ्या अर्थाने कल्याणकारी व संवेदनशील शासनव्यवस्थेचे दर्शन घडवते. ही नियुक्ती केवळ दोन तरुणांना नोकरी देणारी नाही, तर दोन कुटुंबांना सन्मानाने जगण्याची


# ऐतिहासिक अहमदनगरचा पहिला कोल्हापूर टाईप बंधारा फुटला

### ४७ वर्षांची कामगिरी पावसाच्या तडाख्यात खंडित

**कर्जत | प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिला कोल्हापूर पद्धतीचा बंधारा (केटी वेअर) अखेर ४७ वर्षांनी अतिवृष्टीच्या तडाख्यात खचला. कर्जत तालुक्यातील मौजे दिघी येथील या बंधाऱ्याला सीना खोऱ्यात आलेल्या महापुराने धोबीपछाड दिली. अलीकडील पावसाळ्यातील महापूर ओसरल्यानंतर ही हकीकत स्पष्ट झाली असून या बाबतची सविस्तर माहिती राजेंद्रकाका निंबाळकर यांनी दिली. अधिक माहिती देताना निंबाळकर म्हणाले, १९७८ मध्ये तत्कालीन पाटबंधारे मंत्री व जिल्ह्याचे सुपुत्र, स्व. आबासाहेब निंबाळकर यांच्या पुढाकारातून सीनानदीवर वाटेफळ व दिघी येथे हे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे उभारले गेले.

कोल्हापूर पद्धतीचा असा पहिला बंधारा जिल्ह्यात बांधला गेला होता. गेली चार दशके कोरड्या हंगामांना तोंड देणाऱ्या या बंधाऱ्याने अनेक वर्षे आपली उपयुक्तता सिद्ध केली, शेतकरी समृध्द केला. मात्र, यावर्षीच्या विक्रमी पावसामुळे सीना खोऱ्यात आलेल्या पुराच्या पाण्याने हा बंधारा थेट कोसळला. शेतकऱ्यांना सिंचनाची हमी देणारा व पाणी साठवणुकीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरलेला हा बंधारा तुटल्याने स्थानिक शेतकरी व नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.






कोल्हापूर पद्धतीचे बंधारे (K.T. Weir): महाराष्ट्रात कमी पावसाचा प्रदेश (विशेषतः सांगली, सातारा, कोल्हापूर) सिंचनाच्या दृष्टीने कोरडा होता. शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून द्यावे, यासाठी नद्यांवर लहान धरणासारखे उचल बंधारे बांधले गेले. या बंधाऱ्याला लोखंडी पट्ट्यांचे पट्टे (गेट्स) असत.

पावसाळ्यात पाणी वाढले की, हे गेट्स खाली घालतात, म्हणजे पाणी वाहून जाते. उन्हाळ्यात गेट्स उचलतात व नदीत साठलेले पाणी शेतकऱ्यांना उपलब्ध होते. पाण्याचा अपव्यय कमी होतो आणि भूजलपातळी (Groundwater Level) वाढते. यामुळे कमी खर्चात जास्तीत जास्त क्षेत्राला पाणीपुरवठा. देखभालीला सोपा. नदीतील प्रवाह कायम ठेवल्याने मासेमारी व जलचरांना लाभ. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये या पद्धतीचे शेकडो बंधारे आहेत. शेतकऱ्यांना पाणी देणे हिच खरी प्रगती आहे, हे शाहू महाराजांनी ओळखले. कोल्हापूर व कृष्णा नदी खोऱ्यात लहान-लहान उचल बंधारे बांधून शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देण्याचा ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतला. १९०० च्या दशकात प्रथम अशा बंधाऱ्याची कल्पना साकारली आणि पुढे त्यालाच कोल्हापूर पध्दतीचा बांधरा म्हणजेच (K.T. Weir) म्हणून ओळख मिळाली. त्याचमुळे कोल्हापूर जिल्हा व कृष्णा खोरे 'धान्याचा कोठार' म्हणून ओळखले जाऊ लागले. पाण्यामुळे ऊस उद्योग (साखर कारखाने) शक्य झाला. शेतकरी समृद्ध झाला आणि शिक्षण-सामाजिक सुधारणा शक्य झाली. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरात शेतकऱ्यांसाठी पाण्याची क्रांती घडवली. त्यांच्या दूरदृष्टीतून निर्माण झालेले कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आज संपूर्ण महाराष्ट्रात पसरले आहेत. त्यामुळे त्यांना आधुनिक जलसिंचनाचे जनक असेही म्हटले जाते.



## सिनानदी पुरामुळे विजयपूर-सोलापूर रस्ता बंद

**विजयपूर | श्रीकांत काकतीकर**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि सिना नदीवरील कोलेगाव व चांदणी धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्यामुळे, विजयपूर-सोलापूर महामार्ग पुन्हा एकदा बंद करण्यात आला आहे. मागील तीन-चार दिवसांपूर्वीही, हत्तूर येथे सिना नदीच्या पुरामुळे सोलापूरविजयपूर महामार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. आता पुन्हा अशीच स्थिती निर्माण झाली आहे. दक्षिण सोलापूरमधील पूरग्रस्त गावकरी घराची दुरुस्ती करण्यासाठी परत जाण्याची तयारी करत असतानाच, पुन्हा पूरस्थिती निर्माण झाल्यामुळे अधिकाऱ्यांनी त्यांना तात्पुरत्या निवास (काळजी) केंद्रात जाऊन थांबण्याचे निर्देश दिले आहेत. रविवारी रात्री सिना नदीतील पाण्याचा पातळी वाढताना दिसून आली. वडकबळ येथे रात्री ८ वाजेच्या सुमारास पाण्याची पातळी १०.८०० मीटरपर्यंत पोहोचली होती. पाण्याचा प्रवाह वाढल्यामुळे सोमवारी सकाळी सोलापूरविजयपूर रस्त्याचा संपर्क बंद करण्यात आला. पर्यायी मार्ग : सोलापूरविजयपूर राष्ट्रीय महामार्ग बंद असल्यामुळे, सध्या वाहनांची वाहतूक मंद्रूप, कामती, मोहोळ मार्गे वळवण्यात आली आहे. **रयत समाचार**

## शारदोत्सवाच्या सातव्या माळेत 'दातापासून दाताकडे'

### डॉ. रिबेका दोडती यांचे प्रबोधन

**मुंबई | गुरुदत्त वाकदेकर**



दात आणि दातामुळे खुलणारे स्मितहास्य हे सौंदर्य उजळवणारा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. मात्र बदललेली खाद्यसंस्कृती दातांच्या समस्यांना मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. जुन्या काळी आपण खात असलेल्या भाकरी किंवा अपॉलिश भात यांत भरपूर तंतू असायचे. आजच्या अन्नपदार्थांमध्ये मात्र रसायनांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे पचनशक्ती कमी झाली आहे आणि पित्तवृद्धीमुळे दातांवर दुष्परिणाम होत आहेत. जुन्या काळातील दातांवरील म्हणी आजही खरी ठरतात. यावरून स्पष्ट होते की, अखेरीस दातापासून सुरू झालेला प्रवास दातावरच संपतो. त्यामुळे दातांची निगा राखणे अत्यावश्यक आहे,'' असे प्रतिपादन दंतचिकित्सक डॉ. रिबेका दोडती यांनी केले. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम.पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, मराठी विभाग आयोजित शारदोत्सव २०२५ (पाचवे वर्ष) अंतर्गत 'नवदुर्गा : नवविचार व्याख्यानमाला'. सातव्या व्याख्यानात 'दातापासून दाताकडे' या विषयावर त्या बोलत होत्या. डॉ. रिबेका दोडती या दंतचिकित्सक असून मराठीवरील विशेष प्रेमामुळे सध्या त्या सेंट जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा, विरार येथे मराठी पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रश्मी शेटये-तुपे यांनी, स्वागत प्रा. किरण जाधव यांनी, तर आभार प्रदर्शन सामिया काझी हिने केले. प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. कार्यक्रम आभासी माध्यमातून यशस्वीपणे पार पडला. अशा प्रकारे शारदोत्सवाच्या सातव्या माळेत झालेले हे व्याख्यान विद्यार्थिनींसाठी आरोग्याबाबत सजगतेचा संदेश देणारे ठरले. स्मितहास्याचे खरे सौंदर्य दातांच्या आरोग्यात दडलेले आहे, याची जाणीव या प्रबोधनातून प्रत्येक सहभागींच्या मनात दृढ झाली. **रयत समाचार**



## लोकसभा आचारसंहिता भंग प्रकरणी समिती नेत्यांना जामीन

**बेळगाव | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीदरम्यान दाखल झालेल्या अचारसंहिता भंग प्रकरणात महाराष्ट्र एकीकरण समितीचे उमेदवार महादेव पाटील यांच्यासह सहा नेत्यांना अखेर न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. लोकसभा निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करताना धर्मवीर संभाजी महाराज चौकातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान विनापरवानगी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी जमविण्यात आली होती. तसेच बैलगाडीतून विनापरवाना फेरी काढण्यात आली होती. यावरून कॅम्प पोलीस ठाण्यात महादेव पाटील यांच्यासह शुभम शेळके, मनोहर किणेकर, प्रकाश मरगाळे, रेणू किल्लेकर व सरिता पाटील या समिती नेत्यांवर लोकप्रतिनिधी कायदा कलम १२५, कलम १२७ व भारतीय दंड संहिता कलम ५०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याची सुनावणी ता.२९ सप्टेंबर रोजी पाचव्या अतिरिक्त दिवाणी न्यायालयात झाली. सुनावणीत वीस हजारांच्या जातमुचलक्यावर व तितक्याच रकमेच्या जामीनावर समिती नेत्यांना न्यायालयीन अटींसह मुक्त करण्यात आले. न्यायालयाने ''पुन्हा असा गुन्हा घडणार नाही'' या अटीवर जामीन मंजूर केल्याचे स्पष्ट केले. या खटल्यात समिती नेत्यांच्या वतीने वकील महेश बिर्जे, वकील बाळासाहेब कागणकर, वकील रिचमन रिकी व वकील वैभव कुट्रे यांनी बाजू मांडली. तर मालोजी अष्टेकर, धनंजय पाटील, मनोहर हुंदरे व प्रकाश गडकरी यावेळी उपस्थित होते. अचारसंहिता भंग प्रकरणातील सुनावणीमुळे राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. **रयत समाचार**

# फार्मासिस्ट हे केवळ औषधतज्ञ नसून आरोग्यसेवेचे महत्त्वाचे आधारस्तंभ- रेड्डी

## डॉ. पाऊलबुध्दे फार्मसीत वर्ल्ड फार्मासिस्ट डे साजरा

**अहमदनगर । विजय मते**

''फार्मासिस्ट हे केवळ औषधतज्ञ नसून आरोग्य सेवेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. डी.फार्मा, बी.फार्मा अशा अभ्यासक्रमांद्वारे हजारो विद्यार्थी आरोग्य सेवेत प्रवेश करत असून परदेशातही फार्मासिस्टची भूमिका अधोरेखित झाली आहे,'' असे प्रतिपादन सन फार्मास्युटिकलचे डेप्युटी जनरल मॅनेजर नवीन रेड्डी यांनी केले. सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन.जे. पाऊलबुध्दे कॉलेज ऑफ फार्मसीत जागतिक फार्मासिस्ट डे व फार्माकोव्हिजिलन्स वीक २०२५ ''थिंक हेल्थ, थिंक फार्मासिस्ट'' या थीमवर उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्याख्यान, नाटिका, सांस्कृतिक सादरीकरण तसेच ऑनलाइन स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून नवीन रेड्डी यांच्यासह सन फार्माचे सीनियर मॅनेजर डॉ. चक्रधर हादोळे व



अहमदनगर कॉलेजच्या रसायनशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका श्रुती गुंजाळ उपस्थित होते. प्रा. गुंजाळ यांनी ''ऑप्टिकल आयसोमेरिझम'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर रेड्डी यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम आणि औद्योगिक अनुभव यातील संबंध स्पष्ट करत परदेशातील रोजगार संधींचा उल्लेख केला. ''कठोर परिश्रम हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे,'' असा संदेश त्यांनी दिला. बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे समाजातील फार्मासिस्टची भूमिका मांडली, तसेच ''फार्मासिस्ट आर वॉरियर्स ऑफ सोसायटी'' या विषयावर सांस्कृतिक सादरीकरण केले. याशिवाय ''स्लोगन रायटिंग, निबंध लेखन, पोस्टर प्रेझेंटेशन व मेहंदी'' या ऑनलाइन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धांचे विजेते यावेळी जाहीर करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. श्याम पांगा, डी.फार्मसीच्या प्राचार्या अनुराधा चव्हाण, फार्माकॉलॉजी विभागप्रमुख डॉ. वेणु कोला, फार्मास्युटिकल केमिस्ट्री विभागप्रमुख डॉ. रोशनी सूर्यवंशी, ग्रंथपाल स्वाती कडनोर उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रद्धा मुंदडा यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्राजक्ता निमसे यांनी केले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष विनय नाथ पाऊलबुध्दे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, खजिनदार दादासाहेब भोईटे, व्यवस्थापकीय संचालक साई पाऊलबुध्दे व सदस्य रघुनाथ कारमपुरी यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



# स्वच्छता मोहिमेत ग्रामस्थांचा सहभाग, विद्यार्थ्यांचे प्रभावी सादरीकरण

**नगर । रयत समाचार**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे स्वच्छता ही सेवा! या उपक्रमांतर्गत गावातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमादरम्यान शालेय विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तसेच ग्रामस्थांसह सर्वांना सार्वजनिक स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

या मोहिमेत ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यक्रमास जिल्हा परिषद जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा नगर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्र देसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सरपंच उज्वलाताई कापसे, उपसरपंच किरण जाधव, ग्रामपंचायत अधिकारी प्रवीण पानसंबळ, सदस्य पै. नाना डोंगरे, जलजीवन मिशन समन्वयक रवींद्र ठाणगे, क्षमता बांधणी तज्ञ दिपाली जाधव, विस्तार अधिकारी रामदास दळवी, सोनल बालके, मनीषा शिंदे, संदीप तागडकर, मुख्याध्यापिका शांता नरवडे, प्रभाग समन्वयक संदीप वाबळे, सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, व्हाईस चेअरमन संजय डोंगरे, अरुण कापसे आदी मान्यवर उपस्थित होते.

गटविकास अधिकारी राजेंद्र देसले यांनी विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना स्वच्छतेची शपथ दिली. ते म्हणाले, ''सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. स्वच्छतेमुळे साथीचे आजार टाळता येतात. गावाच्या स्वच्छतेसाठी मतभेद व राजकारण बाजूला ठेवून एकदिलाने प्रयत्न करावेत. ओला व सुका कचरा वेगळा करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. विकासाचे खरे ध्येय ग्रामस्वच्छतेतूनच साध्य होणार आहे.''

ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे म्हणाले, ''स्वच्छतेने गावाची पत ठरते आणि प्रतिष्ठा वाढते.

स्वच्छ वातावरणामुळे ग्रामस्थांचे आरोग्य चांगले राहते. डोंगरे सामाजिक संस्था व श्री नवनाथ युवा मंडळाच्या माध्यमातून गावात सातत्याने स्वच्छतेचे उपक्रम राबविले जात आहेत.''

गावात सातत्याने स्वच्छता उपक्रम राबवल्याबद्दल गटविकास अधिकारी राजेंद्र देसले यांनी पै. नाना डोंगरे यांचा सत्कार केला. शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता ही सेवा! या विषयावर प्रभावी पथनाट्य सादर करून ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली

# करचुकवेगिरीतून १०.५३ कोटींचा घोटाळा उघड

## नीलकंठ ट्रेडर्सचा सुरेश कटारिया अटकेत

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर विभागाने करचुकवेगिरी करणाऱ्यांविरोधात सुरू केलेल्या विशेष चौकशी मोहिमेत मोठा घोटाळा उघड झाला. या मोहिमेअंतर्गत मेसर्स नीलकंठ ट्रेडर्सचे मालक सुरेश शिवजी कटारिया (वय ५६) यांना २५ सप्टेंबर २०२५ रोजी अटक करण्यात आली. राज्य कर उपायुक्त (जनसंपर्क) जनार्दन आटपाडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, कटारिया यांनी अस्तित्वात नसलेल्या करदात्यांकडून १०.५३ कोटी रुपयांचे बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवले. विशेष म्हणजे, कोणतेही प्रत्यक्ष वस्तू व्यवहार न करता ही मोठी करचुकवेगिरी करण्यात आल्याचे चौकशीतून स्पष्ट झाले आहे. राज्य कर विभागाने अशा करचुकवेगिरी प्रकरणांविरोधात कठोर कारवाई सुरू ठेवली असून, करदात्यांना प्रामाणिकपणे व्यवहार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कारवाईमुळे करचुकवेगिरी करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला वैभव प्राप्त होईल- थोरात



**अहमदनगर । रयत समाचार**

काँग्रेस हा शहरातील सर्वात जुना पक्ष असून अनेक स्वातंत्र्यसैनिक व जनप्रतिनिधी पक्षाने दिले आहेत. आता शहर जिल्हा काँग्रेसचे नेतृत्व ज्येष्ठ नेते दीप चव्हाण यांच्याकडे आले असून त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला पुन्हा वैभव मिळेल, असा विश्वास माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला. शासकीय विश्रामगृहातील बैठकीत थोरात, आमदार हेमंत ओगले, सचिन गुजर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत दीप चव्हाण यांचा सत्कार झाला. थोरात यांनी महानगरपालिका निवडणुकीसाठी बूथ पातळीपर्यंत पक्ष मजबूत करण्याचे आवाहन केले. सत्ताधाऱ्यांच्या पोषक धोरणांविरोधात काँग्रेस लवकरच जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दीप चव्हाण यांनी काँग्रेसचे जुने वैभव पुनर्स्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन देत कार्यकर्त्यांनी संयम ठेवावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाला श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले, माजी विश्वस्त सचिन गुजर, नगरसेवक करण ससाने, बाळासाहेब भंडारी, फिरोज खान, शाम वाघस्कर, मोहसीन शेख, मयूर पाटोळे, फारूक शेख, माजी नगरसेवक शम्स खान, फैयाज शेख, मनोज गाडळकर, कर्डिले, निजाम भाई जाहागिरदार, मनोज सत्रे, यश चव्हाण यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# रेणुका माता मंदिरात भाविकांची मांदियाळी

**अहमदनगर । रयत समाचार**

एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. नवरात्रातील सातव्या माळेला, रविवार ता. २८ सप्टेंबर रोजी यात्रेनिमित्त दर्शनासाठी हजारो भाविकांची मांदियाळी उसळली.



रिमझिम पावसातही भाविकांचा उत्साह कमी न होता मंदिर परिसर भक्तिभावाने गजबजला. नवरात्राच्या पहिल्या दिवसापासूनच भाविकांची गर्दी वाढू लागली होती. सातव्या माळेला यात्रेनिमित्त मोठ्या संख्येने उपस्थिती दिसली. दर्शनासाठी महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा तयार करण्यात आल्या होत्या. संध्याकाळी आरतीच्या वेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. शहरासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. सुरक्षिततेसाठी संपूर्ण मंदिर परिसरात सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत, तर पोलीस, स्वयंसेवक व होमगार्ड बंदोबस्तासाठी उपस्थित आहेत. देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सव काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मंदिरासमोरील मैदानात आकर्षक पाळणे उभारले असून, बालगोपाळांसह भाविक त्याचा आनंद घेत आहेत. परिसरात विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल, मुलांसाठी खेळणी व महिलांसाठी साहित्याची दुकाने असल्याने यात्रेच्या ठिकाणी गजबजलेले वातावरण निर्माण झाले. यशस्वी व्यवस्थापनासाठी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदी पदाधिकारी विशेष परिश्रम घेत आहेत.

# पूरग्रस्तांच्या मदतीला धावले उद्योजक; आमीची मदत रवाना



**अहमदनगर । रयत समाचार**

राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक गावांत पूरस्थिती निर्माण झाली असून घरे, शेतमाळ आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या भीषण परिस्थितीत पूरग्रस्तांना दिलासा देण्यासाठी नगर एमआयडीसी येथील आमी संघटनेचे उद्योजक मदतीसाठी पुढे सरसावले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी संघटनेतर्फे किराणा कीट्सची तातडीने उभारणी करण्यात आली.

अवघ्या दोन तासांत साखर, शेंगदाणे, तांदूळ, चहा पावडर, तेल आदी जीवनावश्यक वस्तूंचे ६०० पॅकेट्स तयार करून मदत रवाना करण्यात आली. अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील विविध भागांचे प्रचंड नुकसान झाल्याने उद्योग मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील उद्योगांना मदतीचे आवाहन केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत आमी संघटनेच्या उद्योजकांनी तातडीने मदत उभी केली.

संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ म्हणाले, ''कोरोना संकटाच्या काळातही आमी संघटना समाजाच्या पाठीशी उभी राहिली होती. आजही पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आम्ही ठामपणे उभे आहोत आणि भविष्यातही समाजकार्यात पुढाकार घेऊ.'' यावेळी अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांच्यासह संजय बंदिष्टी, सागर निंबाळकर, महेश इंदानी, राजेंद्र कटारिया, सुमित सोनवणे, एमआयडीसी कार्यालयाचे दिलीप काकडे, महेश शिंदे तसेच आमी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.




हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# शेतकऱ्यांची दिवाळी गोड करणार- चेअरमन नागवडे

## नागवडे साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक दर देण्यात नेहमीच आघाडीवर राहिलेल्या सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याची ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमाळीत उत्साहात पार पडली. या सभेत बोलताना कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी यंदाही जिल्ह्यात सर्वप्रथम भावाची कोंडी फोडण्याची घोषणा केली. दिवाळीपूर्वी सभासदांना प्रती टन २५० रुपये अंतिम पेमेंट देऊन शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.



नागवडे म्हणाले, ''सभासदांनी ऊस बाहेरील कारखान्यांना न देता आपल्या कारखान्याकडेच द्यावा. गाळप वाढल्यास माळेगाव व सोमेश्वर कारखान्यापेक्षा १०० रुपये जास्त भाव देण्याची तयारी आहे.'' माजी उपाध्यक्ष केशवराव मगर व बाबासाहेब इथापे यांनी विरोधकांचा ऊस गाळपासाठी न नेल्याची तक्रार नोंदवत पारदर्शक कारभाराची अपेक्षा व्यक्त केली. तसेच भाजप जिल्हा उपाध्यक्ष संदीप नागवडे व माजी संचालक बाळासाहेब काकडे यांनी वार्षिक अहवालातील त्रुटींवर व्यवस्थापनावर टीका केली. सभासद बाळासाहेब पाचपुते, खंडू फराटे, खासेराव घाडगे, ऋषिकेश भोईटे, हरिश्चंद्र पाचपुते, सुनील जाधव, श्रीपाद ख्रिस्ती, हरिभाऊ रायकर, निळकंठ जंगले, ऋषिकेश पाचपुते, संजय क्षीरसागर, महेश तावरे आदींनी कारखान्याचे कौतुक करून काही सूचना मांडल्या. साकळाई योजनेच्या पाण्याबाबत घोड प्रकल्पातून होणाऱ्या संभाव्य पुरवठ्यामुळे घोड लाभधारीत क्षेत्र उध्वस्त होण्याची भीती दिपक पाटील भोसले व रामभाऊ रायकर यांनी व्यक्त केली. यावर अध्यक्ष नागवडे यांनी, ''घोड प्रकल्पातील पाणी शिल्लक दिसण्याचे कारण स्थानिक शेतकऱ्यांनी मागणी न करणे आहे, याचा खुलासा आमदारांनी करावा,'' असे आवाहन केले. या वेळी माजी उपाध्यक्ष केशवराव मगर, बाबासाहेब इथापे यांच्यासह अन्य सभासदांनी पारदर्शक कारभारासाठी सूचना मांडल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष शिंदे यांनी केले, तर कार्यकारी संचालक प्रविण शिंदे यांनी आभार मानले. सभेला उपाध्यक्ष बाबासाहेब भोस, माजी संचालक दत्तात्रय पानसरे, भगवानराव पाचपुते, प्रेमाकाका भोईटे, विठ्ठल काकडे, अरुण पाचपुते, धनसिंग भोईटे, गणपतराव काकडे, दिपक पाटील भोसले, निवृत्ती वाखारे, सतीश मखरे, अनिल पाचपुते, दिलीप वागसकर, नानासाहेब नलगे, रुपेश इथापे, नितीन फलके यांसह सर्व आजीमाजी संचालक मंडळ, कारखाना अधिकारी व मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. रयत समाचार



# अन्नद्रव्य व्यवस्थापनात चिकणमाती कणांचे अनन्यसाधारण महत्व- कुलगुरु डॉ. गडाख

**राहुरी । रयत समाचार**

चिकण मातीच्या कणांमुळे मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते, रासायनीक खतांचा कार्यक्षम वापर होतो आणि मातीमधील प्रदूषण कमी करता येते. पिकांच्या उत्पादनवाढीसाठी अन्नद्रव्यांचे योग्य व्यवस्थापन आवश्यक असते आणि चिकण मातीच्या कणांमुळे हे व्यवस्थापन प्रभावीपणे साध्य होते, असे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी सांगितले. राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठात राहुरी चॅप्टर, भारतीय मृदा शास्त्र संस्था व मृदाशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''३१ वे डॉ. डी.पी. मोतीरमाणी मेमोरीयल व्याख्यान-२०२५'' अंतर्गत माती-वनस्पती प्रणालीतील बहुकार्यात्मक चिकणमाती खनिजे: यंत्रणा, बदल आणि अनुप्रयोग या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी सांभाळले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या मृदा शास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभागाचे माजी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. के.एम. मनजहा उपस्थित होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके व मृदविज्ञान विभाग प्रमुख डॉ. भिमराव कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भिमराव कांबळे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. रितू ठाकरे यांनी तर आभार डॉ. श्रीगणेश शेळके यांनी मानले. या कार्यक्रमाला पुणे, धुळे, कोल्हापूर व हाळगाव येथील मृदाशास्त्रज्ञ, विद्यापीठातील प्राध्यापक, आचार्य आणि पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रयत समाचार



# एकनाथ विद्यालयात माहिती अधिकार जनजागृती

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

माहिती अधिकार दिनानिमित्त एकनाथ माध्यमिक विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. सामाजिक विज्ञान विभागाच्या पुढाकाराने ''माहितीचा अधिकार लोकशाहीचा आधार'' या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. इयत्ता ५वी ते १०वीतील विद्यार्थ्यांनी प्रशासनातील पारदर्शकता, भ्रष्टाचारविरोधी लढा आणि नागरिकांचे अधिकार यांचे प्रभावी चित्रण आपल्या चित्रांतून सादर केले. यावेळी माहिती अधिकार कायदा २००५ विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. नागरिक कोणती माहिती मागवू शकतात, अर्ज करण्याची पद्धत आणि कायद्यातील अपवाद यावर शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक माधवराव काटे यांनी भूषवले. ''लोकशाही मजबूत करण्यासाठी माहितीचा अधिकार हे जनतेचे प्रभावी शस्त्र आहे,'' असे मत त्यांनी व्यक्त केले. या उपक्रमात शिक्षक दिलीपकुमार रणसिंग, प्रकाश दहिफळे, कैलास नजन, नवनाथ कदम, देवेंद्र बोडखे, मुकुंद आरे, विद्या भागवत, संजय मगर यांसह सेवकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रयत समाचार

# पूलालगतचा भाग वाहून गेल्याने जामखेड-करमाळा वाहतूक ठप्प



**जामखेड । रिजवान शेख**

जामखेड तालुक्यातील जवळाकरमाळा रोडवरील सिना नदीवरील पूलालगतचा भाग नदीच्या प्रचंड पाण्याच्या जोरामुळे वाहून गेल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. सोमवार सकाळपासून वाहनचालक आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आज सकाळी सुमारे सहा वाजताच्या सुमारास पुलावरून नदीचे पाणी वेगाने वाहत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. काही वेळातच पाण्याचा जोर वाढताच पुलालगतचा मोठा भाग कोसळून वाहून गेला. त्यामुळे करमाळाजामखेड मार्गावरील संपर्क तुटला असून करमाळ्याकडे जाणे-येणे पूर्णपणे बंद झाले आहे. पूल कोसळल्यामुळे करमाळ्याकडे जाण्यासाठी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे प्रशासनाने वाहनधारकांना आवाहन केले आहे. हळगावअरणगावमहिंजळगाव मार्गे करमाळ्याकडे प्रवास करण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान, पोलिस आणि स्थानिक प्रशासनाकडून वाहतूक नियंत्रण व सुरक्षा उपाययोजना सुरू आहेत. या घटनेमुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी तसेच कामानिमित्त करमाळ्याकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठा फटका बसला आहे. प्रवासाचा वेळ आणि खर्च दोन्ही वाढणार असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिकांकडून प्रशासनाकडे जोर धरू लागली आहे. दरम्यान, नदीला आलेल्या पुराचा धोका कायम असल्याने परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे, अनावश्यक गर्दी टाळावी तसेच जामखेडकरमाळा मार्गावरील प्रवास टाळावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. रयत समाचार



# आमदार विठ्ठलराव लंघे यांचा पूरग्रस्त भागांचा पाहणी दौरा

**नेवासा । विजय खंडागळे**

गोदावरी नदीला आलेल्या प्रचंड पुरामुळे घोगरगाव व जैनपूर परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून जुन्या गावाचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. अनेकांच्या घरात, दुकानात आणि शेतात पाणी घुसल्याने गुरेढोरे, चारा, सोयाबीन, कपाशी, ऊस तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतातील सुपीक मातीही वाहून गेली आहे.

या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी आज दौरा करून पूरग्रस्त कुटुंबांची भेट घेतली. तालुक्यातील सर्व जबाबदार अधिकारी व कार्यकर्त्यांसह त्यांनी प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेत पूरग्रस्तांना दिलासा दिला. आमदार लंघे यांनी तहसीलदार संजय बिरादार, पंचायत समिती गटविकास अधिकारी संजय लखवाल, कृषी अधिकारी यांना तातडीने सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले. तसेच पूरग्रस्तांसाठी जेवण, निवास व आवश्यक सोयी-सुविधांची तत्काळ व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. गंगा, गोदावरी व प्रवरा नदीकाठावरील इतर गावांचीही आमदारांनी व्यापक पाहणी केली असून शेकडो पूरग्रस्तांना तातडीने मदत पोहोचविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. रयत समाचार

# संकट दूर करून शेतकऱ्यांसह सर्वांना सुखी ठेवावे- घार्गे

## पोलीस दलातर्फे मोहटादेवीला मानाची साडी अर्पण

**पाथर्डी । नितीन गटाणी**

आई जगदंबेने अतिवृष्टीचे जिल्ह्यावरील संकट दूर करून शेतकऱ्यां सह सर्वांना सुखी ठेवावे. समाजामध्ये शांतता व सलोखा नांदावा अशी प्रार्थना करत जिल्हा पोलीस दलातर्फे मोहटा देवीला मानाची साडी चोळी जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घारगे यांच्या हस्तेअर्पण करण्यात आली.गेल्या काही वर्षांपासून जिल्हा पोलीस दलातर्फे शारदीय नवरात्र उत्सवात मोहटादेवीला मानाची साडी अर्पण केली जाते. देवी गडाच्या पायथ्यापासून वाजत गाजत बंदोबस्तावरील सर्व पोलीस व उपविभागातील अधिकारी यामध्ये सहभागी होतात. यंदा वाढीव बंदोबस्त नवरात्रोत्सवासाठी देण्यात आल्याने विविध सुरक्षा यंत्रणां सह सेवाभावी काम करणारी कर्मचारी सुद्धा सहभागी झाले. बँडच्या तालावर सुरू असलेली देवीची गाणी, अन्य भाविकांकडून केला जाणारा देवीचा जयजयकार अशा वातावरणामध्ये आलेले पोलीस दल बघण्यासाठी सुद्धा रस्त्याच्या दुतर्फा भाविकांनी गर्दी केली.



देवीच्या गाभाऱ्यापुढे मानवंदना दिल्यानंतर पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे व वैशाली घारगे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. यावेळी शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू अश्विनी राजगुरू, पाथर्डी चे पोलीस निरीक्षक विलास पुजारी व नंदा पुजारी यांनी महापूजा व महाआरतीमध्ये सहभागी घेतला. दरवर्षी सातव्या माळेला पोलिसांकडून देवीला मानाची साडी चोळी अर्पण केली जाते. देवस्थान समितीतर्फे विश्वस्त शशिकांत दहिफळे, डॉ. श्रीधर देशमुख, बाळासाहेब दहिफळे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे यांनी मान्यवरांचे स्वागत करत सन्मानित केले. यावेळी बोलताना घारगे म्हणाले, जिल्ह्यामध्ये मोहटा देवस्थान चा उत्सव असा आहे की जेथे बंदोबस्त करण्यासाठी ड्युटी मिळावी म्हणून पोलिसांकडून वारंवार मागणी केली जाते. पोलीस दलाच्या दृष्टीने सुद्धा हे स्थान अत्यंत श्रद्धेचे व आदराचे असे आहे. येथे आल्यानंतर वेगळीच चैतन्य शक्ती अनुभवायला मिळते. जिल्ह्यामध्ये विविध जागृत व धार्मिक पर्यटन दृष्ट्या महत्त्वाची स्थाने आहेत, या सर्व स्थानांवर सेवा करण्याची संधी पोलीस बांधवांना मिळते, असे भाग्यकारक वातावरण अन्यत्र अनुभवायला मिळत नाही. येथे महापूजा करण्याचा मिळालेला क्षण हा अत्यंत अविस्मरणीय असून येथील चैतन्यदायी वातावरण मनाची सकारात्मकता व शांतता वाढवत अध्यात्मिक अनुभूती सहजपणे मिळू शकते. गेल्या अनेक दिवसांपासून मोहटादेवी येथे स्वतंत्र पोलीस चौकी ची मागणी होत आहे. दसऱ्याच्या दिवशी या चौकीचे भूमिपूजन करण्याबाबत आपण अनुकूल आहोत. देवस्थान समितीने यासाठी पुढाकार घ्यावा. जिल्ह्यातील विविध नवीन पोलीस स्टेशनला राज्य शासनाने मान्यता दिली असून त्यामध्ये पाथर्डी तालुक्यातील तिसगाव पोलीस स्टेशनचे काम अग्रक्रमाने पूर्ण केले जाणार आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलाला मनोबला बरोबरच आत्मबल प्रदान करणारी जिल्ह्यातील अध्यात्मिक स्थाने ही खरी जिल्ह्याची ऊर्जा आहे. एवढ्या गर्दीतही मोहटा देवस्थान व मंदिरा भोवतीचा परिसर मध्ये कमालीची स्वच्छता मनाला प्रसन्नता देणारी ठरते . निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने ही येणाऱ्या काळाचा विचार करता देवस्थान समितीने विकास कामात समावेश केल्यास भाविकांची गर्दी आणखी वाढेल. येथे बंदोबस्त करताना अहोरात्र काम करूनही आमचे कर्मचारी थकत नाहीत यापेक्षा वेगळा चमत्कार कोणता असावा. असे घारगे म्हणाले.

रयत समाचार




# अतिवृष्टी नुकसान व बाजारभाव पाडल्याने शेतकरी संघटनेचे धरणे आंदोलन

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर तहसील कार्यालयासमोर सोमवारी स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी व शेतकरी युवा आघाडी यांच्या वतीने भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. अतिवृष्टी, रोगराई व शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, तातडीने मदत व योग्य दर मिळावेत, या मागणीसाठी शेकडो शेतकरी रस्त्यावर उतरले. सोयाबीन पिकावर टव चारकोल रॉट व यलो मोझॅक रोगामुळे मोठे नुकसान झाले आहे. तूर पिक सुकत आहे, कपाशीची वाढ थांबली असून ती पिवळी पडली आहे. यामुळे उत्पादनात मोठी घट येणार असल्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली. त्यातच केंद्र सरकारने कापूस, तूर व कडधान्यांवरील आयात शुल्क रद्द करून परदेशातून मोठ्या प्रमाणात आयात सुरू केल्याने देशातील शेतमालाचे भाव कोसळले आहेत. आंदोलनकर्त्यांनी शासनाला केलेल्या मागण्या : अतिवृष्टीग्रस्तांना ओला दुष्काळ जाहीर करून एन.डी.आर.एफ. निकष बाजूला सारत सरसकट एकरी ५० हजार रुपये मदत द्यावी. सत्ताधाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे संपूर्ण कर्जमुक्ती करून ७/१२ कोरा करावा. कपाशीच्या खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीऐवजी ऑफलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून द्यावी व खरेदी सुरू असेपर्यंत नोंदणी चालू ठेवावी. कांद्याला प्रती क्विंटल १,५०० रुपये अनुदान द्यावे. शासकीय शेतीमाल खरेदी केंद्रे तातडीने सुरू करावीत. या मागण्यांची अंमलबजावणी तातडीने न केल्यास उग्र आंदोलन उभारण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार मिलिंद वाघ यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनावर स्वतंत्र भारत पक्ष शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष नीलेश शेडगे, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष मयूर भनगडे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सुनीताताई वानखेडे, तसेच मंदा गमे, आशाताई महांकाळे, सुनंदा चोरमल, कोमल वानखेडे, शीतल पोकळे, नवनाथ दिघे, प्रकाश जाधव, शुभम बनसोडे, सुमीत शेळके, तेजस चव्हाण, अजिंक्य शेजुळ, मधू काकड, अशोक आव्हाड, संतोष दातीर, गौरव मोरे, विष्णू भनगडे, बाळासाहेब घोगरे, जगदीश खरात, बाबासाहेब गायकवाड, रवी वानखेडे, अंबादास गमे, युवराज देवकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडवले नाहीत तर हे आंदोलन आणखी तीव्र होणार, असा इशारा संघटनांनी दिला आहे. रयत समाचार

# भारतच आशियाचा राजा

रविवारी दुबईत झालेल्या आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५ विकेट्सने धुव्वा उडवत भारताने आशिया चषकावर विक्रमी नवव्यांदा नाव कोरत इतिहास रचला. विशेष म्हणजे या स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा सलग तीनदा पराभव करत हॅट्ट्रिक साजरी केली. रविवारी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताच्या फिरकी गोलंदाजांनी त्यातही कुलदीप यादवने अप्रतिम गोलंदाजी करत पाकिस्तानच्या फलंदाजांची पळता भुई थोडी केली. कुलदीप यादवने अंतिम सामन्यात भेदक गोलंदाजी करताना अवघ्या ३० धावात ४ बळी मिळवले. विशेष म्हणजे त्याने आपल्या चौथ्या षटकात पाकिस्तानचे तीन फलंदाज बाद केले. त्याला वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल, जसप्रीत बुमरा यांनी चांगली साथ दिली. या तिघांनी प्रत्येकी २ बळी मिळवत श्रीलंकेला अवघ्या १४६ धावात रोखले. विशेष म्हणजे पाकिस्तानने त्यांच्या डावाची सुरुवात धमाकेदार केली. त्यांच्या सलामीच्या जोडीने धडाकेबाज सुरुवात करून भारतीय गोलंदाजांना चकित केले. ९ धावांच्या सरासरीने त्यांनी धावा काढल्या मात्र १ बाद ११३ अशा सुस्थितीतून त्यांची घसरगुंडी उडाली. वरुण चक्रवर्तीने दुसरा बळी मिळवल्यावर पाकिस्तानची गाडी रुळावरून घसरली. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी आपल्या धारधार गोलंदाजिने पाकिस्तानच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. अवघ्या ३३ धावात भारताने पाकिस्तानचे ९ फलंदाज बाद केले. भारताच्या फिरकी गोलंदाजीपुढे पाकिस्तानची फलंदाजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोलमडली आणि पाकिस्तानचा संघ पूर्ण २० षटके देखील खेळू शकला नाही. १४७ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेला भारतीय संघ किती षटकात विजय मिळवणार असाच प्रश्न विचारला जात होता मात्र पाकिस्तानच्या गोलंदाजांनी भारताचे पहिले तीन फलंदाज स्वस्तात बाद करून क्रिकेटप्रेमींची धाकधूक वाढवली मात्र भारताचा मधल्या फळीतील युवा फलंदाज तिलक वर्मा याने एक बाजू लावून धरत शानदार अर्धशतक झळकावले त्याला यष्टिरक्षक संजू सॅमसन आणि अष्टपैलू शिवम दुबेने चांगली साथ दिली. त्यामुळे भारताने सहज विजय मिळवला आणि १४५ कोटी देशवासीयांना विजयादशमीची गोड भेट दिली. भारतीय संघाने सर्वाधिक ९ वेळा आशिया चषकावर मोहोर उमटवत आपणच आशियाचा राजा आहोत हे सिद्ध केले. भारताने या स्पर्धेत अप्रतिम कामगिरी केली. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. भारताच्या सर्वच खेळाडूंनी चांगली कामगीरी करून आपण फॉर्मात असल्याचे दाखवून दिले. अभिषेक शर्मा, शुभमन गिल, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, संजू सॅमसन या भारताच्या सर्वच फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. सूर्यकुमार यादवने फलंदाजीत चमकदार कामगिरी केली नसली तरी त्याने संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. गोलंदाजीतही बुमराह, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल यांनी चांगली कामगिरी केली. शिवम दुबेने दमदार अष्टपैलू कामगिरी केली. कुलदीप यादव तर या स्पर्धेत भारताचा ट्रम्पकार्ड बनला होता त्याची फिरकी प्रतिस्पर्धी संघातील कोणत्याच फलंदाजाला समजली नाही. त्याने या स्पर्धेत सर्वाधिक १७ बळी टिपले. ही स्पर्धा भारतीय संघासाठी खूप महत्वाची होती कारण ऑपरेशन सिन्दुर नंतर भारत पहिल्यांदाच पाकिस्तान समोर उभा ठाकणार होता. त्यामुळे ही स्पर्धा जिंकून भारतीय खेळाडू पहलगाम हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली वाहतील आणि भारतीय सैनिकांना मानवंदना देतील ही अपेक्षा होती अखेर ती खरी ठरली. भारतीय संघाने एकदा नव्हे तर तीनदा पाकिस्तानला चारी मुंड्या चित करून पहलगाम हल्ल्यातील शहिदांचा मैदानात बदला घेतला. संपूर्ण स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हातमिळवणी केली नाही इतकेच नाही तर अंतिम सामन्यात विजय मिळवल्यानंतर पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाच्या अध्यक्षांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारण्यास नकार देत पहलगामवर भ्याड हल्ला करणाऱ्या पाकिस्तानचा कृतीतून निषेध व्यक्त केला. भारतीय संघाच्या या कृतीने देशवासीयांची मने जिंकली. भारताने जरी ट्रॉफी स्वीकारली नसली तरी आशिया चषकाचा अंतिम सामना जिंकत भारतच आशियाचा राजा आहे हे सिद्ध केले. आशिया चषक विजेत्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# मिशन माणुसकी : दैनिक रयत समाचारच्या पूरग्रस्त सहकार्य आवाहनास प्रतिसाद



दैनिक रयत समाचारच्या मिशन माणुसकी या पुरग्रस्त माणसांच्या सहकार्यासाठी हाकेला ''ओ'' देत किराणा सामान देणाऱ्या व्यक्ती. १) ललिता केदारे, २) कविता कराळे आणि सहकारी, ३) डॉ. रविकांत पाचारणे आणि सहकारी.

# ओला दुष्काळ जाहिर करुन तात्काळ कर्जमाफी करा- आळेकर

## श्रीगोंदा सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा सोसायटीची १०८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, ता. २७ सप्टेंबर २०२५ रोजी अध्यक्ष पोपट दत्तू कोथिंबीरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सचिव राजुशेठ सिदनकर यांनी अजेंडा व आर्थिक पत्रके सादर केली. माजी संचालक एकनाथ आळेकर यांनी ओला दुष्काळ जाहीर करून तातडीने कर्जमाफी करावी, असा ठराव मांडला. शासनाने कर्जमाफीची घोषणा केली असून वसुलीवर परिणाम झाल्याने संस्था आर्थिक अडचणीत आल्याचे त्यांनी नमूद केले. ठरावास शिवाजी राऊत यांनी अनुमोदन दिले. इमारत बांधकामातील दिरंगाईबाबत



माजी चेअरमन अशोक आळेकर यांनी स्पष्टीकरण दिले. दादासाहेब औटी यांनी कर्जमाफीचा निर्णय लवकर घ्यावा असे आवाहन केले. चर्चेत दादासाहेब खेतमाळीस, डॉ. चंद्रकांत कोथिंबीरे, राजू दादा गोरे, ज्ञानदेव शिरवाळे, संजय खेतमाळीस, नानासाहेब शिंदे, भाऊसाहेब होले, मुकुंद सोनटक्के, शिवाजी शेळके यांनी सहभाग घेतला. मुंबई पोलीस दलातील सेवानिवृत्त अधिकारी कांतिलाल कोथिंबीरे यांनी सभासदांनी घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड करावी असे सांगितले. तुळशिदास मंगल कार्यालय उपलब्ध करून दिल्याबद्दल नगरसेवक प्रशांत गोरे यांचा सत्कार झाला. अध्यक्ष पोपट कोथिंबीरे यांनी सभासदांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन सुचनांची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले. उपाध्यक्ष सुर्यकांत वडवकर यांनी आभार मानले. या सभेसाठी संचालक बापुराव सिदनकर, मोहनराव डांगरे, सुनील बोरूडे, सुभाषराव बोरूडे, राजू दादा गोरे, सखाराम औटी, अनिल नन्नवरे, हनुमंत उदमले, मंदाकिनी वडवकर, ज्योतीताई खेतमाळीस, सुमनबाई शिरवाळे, कालिदास खेतमाळीस, बाबूशेठ बोडखे, जगन्नाथ औटी, भाऊसाहेब मखरे, पोपटराव बोरूडे, बापुराव औटी, नगरसेवक नानासाहेब कोथिंबीरे, लक्ष्मण कोथिंबीरे, बाळासाहेब कोंबडे, अरुणकाका खेतमाळीस, रोहीदास मखरे यांच्यासह कर्मचारीवर्ग आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लोखंडेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला पक्षी निरीक्षणाचा आनंद


**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

शहरालगतच्या लोखंडेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेट सहली अंतर्गत तलावावर जाऊन दुर्बिणीद्वारे पक्षी निरीक्षणाचा आनंद घेतला.

या वेळी विद्यार्थ्यांनी विविध पक्ष्यांची माहितीही आत्मसात केली. श्रीगोंदा शहरातून वाहणाऱ्या सरस्वती नदीवर शहराच्या दक्षिणेला कापसेवस्ती येथे बंधारा बांधलेला आहे. वर्षभर या बंधाऱ्यावर पाणी साठलेले असल्याने विविध पक्ष्यांचा येथे वावर असतो. हिवाळ्यात फ्लेमिंगो पक्ष्यांचेही दर्शन येथे घडते. शाळेचे शिक्षक डॉ. संदीप मोटे व मंगल जाचक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उच्च दर्जाच्या दुर्बिणीद्वारे बदक, बगळे, पानकावळे, भारद्वाज यांसारख्या अनेक पक्षी जवळून पाहिले. शेजारील पुरातन साळवनदेवी मंदिराची माहिती घेण्याची संधीही विद्यार्थ्यांना मिळाली. निसर्गसौंदर्य आणि विविध पक्ष्यांच्या सान्निध्यात विद्यार्थ्यांनी अविस्मरणीय अनुभव घेतल्याने ते भारावून गेले. रयत समाचार

# महाकवी गायधनी यांचे दुसरे महाकाव्य अमेरिकेत प्रकाशित






**नागपूर । रयत समाचार**

महाकवी सुधाकर गायधनी यांचे चौसष्ट योगिनीवर आधारित महाकाव्य योगिनींच्या स्वप्न सावल्या हे दुसरे महाकाव्य आता शॅडोज ऑफ योगनीज ड्रीम्स या शीर्षकाखाली अनुवादित होऊन अमेरिकेतील प्रख्यात प्रकाशक नॉक्टरनिक बुक्स यांनी प्रकाशित केले आहे. या आंतरराष्ट्रीय प्रकाशनासाठी कवी ॲलेक्स जॉनसन यांनी भूमिका बजावली आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे आर्टिस्ट युरोपातील कादंबरीकार व डिझायनर ॲड्रियन बाल्डविन असून त्यांनी पुस्तकाची सजावट आणि मुद्रण व्यवस्था सांभाळली आहे. कार्मिकेल-कॅलिफोर्नियातील इंग्रजी विषयाचे प्रा. जॉनसन हे प्रबुद्ध भारत नियतकालिकाचे संपादक असून त्यांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेत सांगितले की, ''गहन आध्यात्मिक अंतर्दृष्टी आणि काव्यात्मक प्रतिभेने भरलेले हे महाकाव्य अनुभवण्याचा अनुभव दुर्मिळ योगासमान आहे.'' या महाकाव्याचा प्रवास शाब्दिक आणि आध्यात्मिक दोन्ही दृष्टिकोनातून होमर आणि मिल्टनच्या काव्यांमध्ये आढळणाऱ्या वैभव व भीतीचे उदात्तीकरण करतो, मात्र गायधनी अनुकरण करणारे कवी नाहीत. मूळ मराठी महाकाव्य आठ खंडात असून ते २०१६ साली लोकवर्गणी प्रकाशनातून प्रकाशित झाले होते. या काव्याचा अनुवाद प्रा. डॉ. दत्ता सावंत आणि खुद्द गायधनी यांनी केला आहे.

# प्राथमिक शिक्षकांना रोटरीचा 'नेशन बिल्डर' पुरस्कार

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीतर्फे उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल राष्ट्र उभारणीचे शिल्पकार (नेशन बिल्डर) पुरस्कार तालुक्यातील पाच शिक्षकांना जाहीर झाले आहेत.

या पुरस्कारांचे वितरण बुधवार, ता. १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता शेवगाव पंचायत समितीच्या सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. कैलास दौंड व रोटरीचे उपप्रांतपाल ईश्वर बोरा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. रोटरी क्लबचे अध्यक्ष युसूफखान पठाण, सचिव प्रा. विजयकुमार मुधोळकर व खजिनदार प्रा. गजानन लोंढे यांनी ही माहिती दिली. पुरस्काराचे स्वरूप गौरवचिन्ह, प्रशस्तीपत्रक, शाल व श्रीफळ असे आहे. या कार्यक्रमाला तालुक्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रोटरी क्लबच्या वतीने करण्यात आले आहे. या वर्षी जाहीर झालेल्या पुरस्कार विजेत्या शिक्षकांमध्ये सुवर्णमाला दळवी (जि. प. प्रा. शाळा राक्षी), संतोष टकले (जि. प. प्रा. शाळा जमधडेवस्ती, भातकुडगाव), लक्ष्मण पिंगळे (जि. प. प्रा. शाळा काळेगाव-भायगाव), सुंदर सोळंके (जि. प. प्रा. शाळा कर्डिलेवस्ती-कांबी) आणि पांडुरंग नांगरे (जि. प. प्रा. शाळा कुरूडगाव) या पाच शिक्षकांचा समावेश आहे. रयत समाचार

# लॉन टेनिस स्पर्धेत काकडे जिल्ह्यात प्रथम

**नेवासा । विजय खंडागळे**



नेवासा तालुक्यातील सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सोनई येथे इयत्ता अकरावीत शिकणारा विद्यार्थी सूर्या कमलेश काकडे याने नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय लॉन टेनिस स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून तालुक्याचा मान उंचावला आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध भागांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. कडव्या स्पर्धेत उत्कृष्ट कौशल्य आणि चिकाटीच्या जोरावर सूर्या काकडे याने अंतिम फेरीत प्रतिस्पर्ध्यावर मात करून विजेतेपद मिळवले. या उल्लेखनीय यशामुळे त्याची झोनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सूर्याच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक किरण सोनवणे, विद्यालयाच्या प्राचार्या ज्योती सोनवणे, शिक्षकवर्ग, पालकवर्ग तसेच ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन केले. या यशामध्ये सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे सूर्या आणि कुटुंबीयांनी सांगितले असून विविध स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रयत समाचार



# डॉ. हमीद दाभोलकर यांना रावबहादूर संभाजीराव मोरे दुदुस्कर पुरस्कार प्रदान

**सातारा । रयत समाचार**

सातारा शहरात आयोजित कार्यक्रमात यंदाचा 'रावबहादूर संभाजीराव मोरे दुदुस्कर पुरस्कार' अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते डॉ. हमीद दाभोलकर यांना प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नातू ॲड. सुभाषबापू पाटील यांच्या हस्ते डॉ. दाभोलकर यांना देण्यात आला. डॉ. दाभोलकर यांनी आपल्या कार्यातून समाजात विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सामाजिक बांधिलकी रुजवण्याचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांच्या या समाजकार्यास मान्यता देत हा पुरस्कार देण्यात आल्याने उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

समाजमनावर प्रभाव पाडणाऱ्या आणि परिवर्तन घडविणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची ही परंपरा कायम राहावी, अशी भावना यावेळी ॲड. सुभाषबापू यांनी व्यक्त केली. हा पुरस्कार सोहळा साताऱ्यातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

# पूरग्रस्तांसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मदतीचा हात

**पाथर्डी । रयत समाचार**

तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीने व मुसळधार पावसामुळे पाथर्डी तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक घरात पाणी शिरले. शेतजमिनी पाण्याखाली गेल्या, घरे व झोपड्यांना फटका बसला तसेच अनेक कुटुंबांना अन्न धान्याची टंचाई जाणवू लागली. या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने पुरग्रस्तांना मदतीचा हात देत किराणा सामान पुरविण्यात आले.

भालगाव परिसरातील सिंदफना नदीला महापूर आल्याने खरमाटवाडी येथे मोठ्या प्रमाणात हानी झाली. शेकडो घरात पाणी शिरले. कोळसांगवी येथील नदीकाठच्या दलित वस्तीमध्ये पाणी घुसले होते त्यामुळे मोठ्या प्रमाणात घराचे नुकसान झाले. या मदत कार्यामध्ये खरमाटवाडी, भालगाव व कोळसांगवी या गावांतील पुरग्रस्त कुटुंबांना किराणा किट वाटप करण्यात आले. जीवनावश्यक वस्तूंमध्ये तांदूळ, डाळी, तेल, पीठ, साखर, मसाले, बिस्किटे, शेंगदाणे, पोहे, साबण आदी साहित्याचा समावेश होता. प्रत्येक कुटुंबापर्यंत ही मदत पोहोचावी यासाठी स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घेतला. या



मदतीमुळे पुरग्रस्तांनी समाधान व्यक्त करत आभार मानले.

आपत्तीच्या काळात समाजकार्य आणि संघटित प्रयत्न किती महत्त्वाचे असतात याचे उदाहरण या मदतकार्याने पुन्हा अधोरेखित केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सेवा भारती यांच्या वतीने करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पाथर्डी तालुक्यातील पूरग्रस्त कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे. या कार्यात तालुका संघचालक अरविंद पारगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका संघ कार्यवाह शैलेश शिरसाठ, सेवा विभाग प्रमुख अमोल केरकळ, संघ स्वयंसेवक अनिल खाटेर, योगेश शिंदे, मयुर रोडी, सुनिल महाजन सर, कौतुक चिंतामणी, गणेश जवरे, मेधाताई चिंतामणी, सिद्धार्थ रोडी, प्रकाश बालवे, दर्शन रोडी, पंकज राठी आदी सहभागी झाले होते.